INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
(Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal)
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 8.428 (SJIF 2026)

दामोदर कोसंबी यांच्या बौद्ध धर्मावरील लेखनाचा चिकित्सक अभ्यास

(A Critical Study of Damodar Kosambi's Writings on Buddhism)

डॉ. प्रविण बोरकर

सहयोगी प्राध्यापक,
पदवी व पदव्युत्तर इतिहास विभाग,
आर. के. तलरेजा कॉलेज, उल्हासनगर (महाराष्ट्र, भारत)
E-mail: pravinborkar.rkt@gmail.com

DOI No. 03.2021-11278686 DOI Link :: https://doi-ds.org/doilink/11.2026-13766952/IRJHIS2611008

सारांश :

दामोदर कोसंबी हे आधुनिक भारतातील महत्त्वाचे गणितज्ञ व इतिहासकार होते. त्यांना इतिहासकार म्हणून अधिक प्रसिद्धी मिळाली. त्यांनी भारतातील इतिहास पद्धतीला मोठे योगदान दिले आहे. त्यांनी आधुनिक काळात भारतात मार्क्सवादी इतिहास पद्धतीचा पाया घातला त्यामुळे शास्त्रशुद्ध मार्क्सवादी इतिहास लेखन पद्धती विकसित होऊन एक प्रवाह निर्माण झाला. कोसंबींनी प्राचीन भारतातील अनेक विषयवार लेखन केले आहे, निबंध लिहिले आहेत. प्राचीन भारतातील सिंधू संस्कृती, वैदिक आर्य, भगवदगीता व बौद्ध धर्म अशा अनेक विषयवार त्यांनी ऐतिहासिक विश्लेषण केले आहे. त्यांची विश्लेषण पद्धती ही वैज्ञानिक भौतिकवादी असल्याने या विश्लेषणात नाविन्य आहे. कोसंबींचे वडील धर्मानंद कोसंबी हे बौद्ध धर्माचे मोठे विद्वान होऊन गेलेत, त्यांचा प्रभाव दामोदर कोसंबी यांच्यावर पडला, परंतु दामोदर कोसंबींनी आपल्या वडिलांप्रमाने बौद्ध धर्माच्या अभ्यासाला वाहून न घेता गणित विषयात प्राविण्य मिळवले. पुढे इतिहासाच्या क्षेत्रात आल्यावर त्यांनी मार्क्सवादी पद्धतीचा अंगीकार करत त्या दृष्टीने भारतीय इतिहासाचे विशेषतः प्राचीन भारताच्या इतिहासाचे पुनर्लेखन व विश्लेषण केले. त्यांच्या लेखनातील एक महत्त्वाचा विषय म्हणजे 'बौद्ध धर्म' होय. त्यांच्या इतिहास विषयक ग्रंथांमध्ये व निबंधांमध्ये त्यांनी बौद्ध धर्माच्या अनुषंगाने चर्चा केली आहे. प्रस्तुत संशोधन लेखामध्ये त्यांच्या बौद्ध धर्मावरील लेखनाची चिकित्सा करून त्याचा मागोवा घेणे हा उद्देश आहे.

मुख्य शब्द : *दामोदर कोसंबी, बौद्ध धर्म, जातककथा, जैन धर्म, महायान, ह्यूएनत्संग, बख्तियार खिलजी, भिक्खू, ब्राह्मण.*

प्रस्तावना :

दामोदर कोसंबींविषयी थोडेसे :

दामोदर कोसंबींचा यांचा जन्म गोव्यातील 'कोसंबे' गावी ३१ जुलै १९०७ रोजी झाला. वयाच्या ११ वर्षेपर्यंत त्यांचे शिक्षण पुण्यातील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये झाले. १९१८ मध्ये ते त्यांचे वडील धर्मानंद कोसंबींबरोबर अमेरिकेला गेले, तिथे हार्वर्ड या नामांकित विद्यापीठात त्यांनी अध्ययन केले. १९२९ पर्यंत त्यांनी गणित, इतिहास व भाषा या ३ विषयांत बी. एस्सी. पदवी मिळवली. सोबतच त्यांनी ग्रीक, लॅटिन, जर्मन, व फ्रेंच या भाषांवर प्रभुत्त्व मिळवले. भारतात परतल्यावर त्यांनी बनारस हिंदू विद्यापीठात २ वर्षे तसेच अलिगड मुस्लिम विद्यापीठात काही काळ अध्यापन केले. १९३३ मध्ये ते पुण्यात स्थायिक झाले. तिथे ते फर्ग्युसन महाविद्यालयात शिकवू लागले. गणित हा कोसंबीचा मूळ विषय होय. पुढे ते संख्याशास्त्र-नाणकशास्त्र व तिथून भारताच्या प्राचीन इतिहासाकडे वळले.

दामोदर कोसंबी यांनी १९४६ मध्ये मुंबईतील 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च' या संस्थेत प्रवेश केला. १९४७ मध्ये त्यांनी इंडियन सायन्स काँग्रेसच्या गणितविषयक विभागाचे अध्यक्षपद भूषविले. १९४९ मध्ये ते शिकागोला अतिथी प्राध्यापक म्हणून गेले होते. याच वर्षी त्यांनी प्रिन्स्टन येथे प्रसिद्ध वैज्ञानिक आईनस्टाईन यांची भेट घेतली. १९६२ पर्यंत टाटा इन्स्टिट्यूटमधील गणितविषयक संशोधनाबरोबर त्यांचे इतिहासाचे संशोधन जोमात सुरु होते. त्यांनी जागतिक शांतता परिषदेच्या निमित्ताने विज्ञान परिषदा व ज्ञानसत्रे यासाठी त्यांनी युरोप व अमेरिका खंडातील अनेक देशांना तसेच रशिया व चीनलाही भेटी दिल्या. गणित व इतिहासातील संशोधनामुळे गणिती आणि प्राचीन भारताच्या इतिहासाचे वस्तुनिष्ठ अभ्यासक अशी दुहेरी ख्याती त्यांना मिळाली. १९६२ मध्ये सेवानिवृत्त झाल्यावर त्यांचे वास्तव्य पुण्यातच होते. २९ जून १९६६ रोजी त्यांचे निधन झाले.

कोसंबींचे बौद्ध धर्मविषयक लेखन :

कोसंबींनी एकूण १५० संशोधनात्मक लेख व प्रास्ताविक ग्रंथ लिहिले. यातील काही लेख एकत्र करून त्यांनी 'दि स्टडी ऑफ इंडियन हिस्टरी' (१९५६) आणि 'दि कल्चर अँड सिव्हिलायझेशन ऑफ एनशंट इंडिया इन हिस्टॉरिकल आऊटलाइन' (१९५६) असे दोन महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिले. त्यांच्या लेखांपैकी ५ लेख 'मिथ अँड रियालिटी' या पुस्तकात एकत्रित केले आहेत व इतर निवडक लेख 'एग्झास्परेटिंग एसेज्' या नावाने प्रसिध्द झाले आहेत. कोसंबींनी बौद्ध धर्मावर वेगळे लिखाण केले नाही, मात्र त्यांच्या उपलब्ध पुस्तकात त्यांनी विविध प्रसंगानुरूप बौद्ध धर्मावर लिहिले आहे, जे ऐतिहासिक दृष्टीने महत्त्वाचे आहे. बौद्ध धर्माच्या उदयापासून ते त्याचा विकास, बौद्ध धर्म व जैन धर्म, बौद्ध धर्म व ब्राह्मणी धर्म व परंपरा, बौद्ध धर्माचा प्रभाव, त्याचे तत्त्वज्ञान व त्याचा झालेला ऱ्हास अशा काही प्रमुख उपविषयांसह त्यांनी बौद्ध धर्माचा मागोवा घेतला आहे. कोसंबींच्या बौद्ध धर्मावरील लेखनातून ज्या महत्त्वाच्या बाबी पुढे येतात त्याचा चिकित्सक अभ्यास या शोधनिबंधात करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

बौद्ध धर्माचा प्रसार :

प्राचीन भारतात उदयास आलेला महत्त्वाचा धर्म म्हणजे बौद्ध धर्म होय. बौद्ध धर्माने संघटित पद्धतीने धर्मप्रसार केला त्यामुळे हा धर्म भारतातच नव्हे तर इतर देशांमध्येही पोहोचला. बौद्ध धर्माच्या प्रसाराचा हेतू मानवी कल्याणाचा असल्याने तो सर्वदूर पसरला व आशिया खंडाची ओळख बनला. कोसंबी लिहितात, "ह्यापैकी सर्वात मोठा म्हणजे बौद्धधर्म होय. तो मगधाच्या सीमेपलीकडे दूरवर पसरला. आशियातील लाखो लोकांच्या दृष्टीने भारत एक पवित्र भूमी म्हणून मानली जाऊ लागली. कारण बौद्धमताचा येथे उदय झाला होता. चीन तिबेट, मंगोलिया यांसारख्या दूर देशातील यात्रेकरू आजदेखील उत्तुंग पर्वतराजी, धगधगीत वाळवंटे व तुफानी महासागर ओलांडून, जेथे अनाकलनीय भाषा बोलल्या जातात, अशा देशातून येथे येऊन सारनाथ येथील मुख्य स्तूपाच्या सावलीत आपल्या साध्यासुध्या प्रार्थना म्हणतात." (२००६, १५६) बौद्ध धर्म आशियातील अनेक भागांमध्ये पसरला उदा. तिबेट, चीन मंगोलिया इत्यादी. बौद्ध धर्म नुसता या देशांमध्ये पसरला नाही तर या धर्माने मंगोलिया, चीन व तिबेट या देशांमध्ये क्रांतिकारी बदल घडवून आणले, दूरगामी परिणाम या देशांवर झाला. कोसंबींच्या मते, "बौद्धधर्म ही मंगोलियात समाजसुधारणा घडवून आणणारी एक विशाल शक्ती ठरली. चीनमध्ये तो धर्म सरदारात शांतता स्थापन करणारा व सरंजामशाहीचा प्रमुख आधार झाला. तुरळक वस्ती असलेल्या व दुष्प्रवेश्य अशा तिबेटातील सर्वधर्म सत्ता व राज्यसत्ता ह्या दोन्ही बौद्ध धर्मग्रंथावर आधारल्या होत्या." (२००६, १५७) चीन आणि मंगोलियाच्या तुलनेत तिबेटवर बौद्ध धर्माचा मोठा प्रभाव पडला, तो प्रभाव आजतागायत टिकून आहे.

ख्रिस्ती व इस्लामवरील प्रभाव :

बौद्ध धर्माने विविध कला व स्थापत्यात हातभार लावला त्यामुळे जगविख्यात कलाकृती निर्माण झाल्यात, या कलाकृती व स्थापत्य वारसा आजही त्या काळाची साक्ष देत आहेत. आज या कलाकृती व स्थापत्य वारसा वैभवशाली संस्कृतीची आठवण करून देतात. याचबरोबर बौद्ध धर्मातील बुद्धाच्या अनुषंगाने अनेक पारंपारिक कथा निर्माण झाल्या. अशा अनेक कथा आपल्याल्या 'जातक कथांमध्ये' पाहायला मिळतात. अशा कथांचा परिणाम ख्रिश्चन धर्मावर पडल्याचे कोसंबी नमूद करतात, ते लिहितात, "त्याच्या पारंपारिक कथांमुळे ख्रिस्ताचे पाण्यावरून चालणे, बारलाम व जोसाफात सारख्या ख्रिस्ती संतांच्या कथा बौद्ध धर्माच्या अनुकरणामुळे अस्तित्त्वात आल्या. विद्वानांनी कुम्रान (मृत समुद्र) येथील लेखपटावरून अनुमानलेली 'एसेनियन' 'सदाचारी धर्मोपदेशक' ही पदवी बुद्धाशी अगदी समानार्थक आहे, (शास्ता अथवा धम्मचक्कपवत्तक्क) हा केवळ योगायोग नाही." (२००६, पृ. १५७) बौद्ध धर्माचा जसजसा प्रचार-प्रसार होत गेला तसतसा त्याचा प्रभाव अन्य धर्मावर व धर्ममतांवर देखील पडल्याचे दिसून येते. ख्रिश्चन धर्माबरोबर, मॅनिकीझमवर तसेच इस्लामवर देखील पडल्याचे समजते. या अनुषंगाने कोसंबींनी सुद्धा त्यांचे मत मांडले आहे, त्यांच्या मते, "मॅनिकीझमच्या धर्ममतावर बौद्ध धर्माचा निश्चित प्रभाव पडला आहे. मुसलमानातील लुकमानदेखील अखेरीस बुद्ध असण्याचा संभव आहे. अरेबियन नाईट्मधील ज्याच्या रिकाम्या मेजवानीमुळे ह्या नामाचे एक विशेषण बनले. तो बार्मेसाइड नामक मंत्री पर्शियामधील बौद्ध धर्माधिकाऱ्यांच्या (परमक) वंशात जन्मला होता." (२००६, पृ. १५७) कोसंबी या विधानातून हे सिद्ध करू इच्छितात की, बौद्ध धर्म हा भारत किंवा पूर्व आशिया पर्यंत मर्यादित नव्हता तर त्याने पश्चिमेकडील पर्शिया (इराण) मधील मॅनिकीझम सारख्या धर्मावर प्रभाव पाडला. इस्लामी आणि अरबी संस्कृतीत 'लुकमान' सारख्या पात्राच्या रूपाने बुद्धाचे विचार अजरामर झाले. एवढेच नाही तर मध्य-पूर्वेतील अब्बासी खलिफांच्या बौद्धिक व प्रशासकीय प्रगतीत परमक (बार्मेसाइड) या बौद्ध पार्श्वभूमी असलेल्या घराण्याचे मोठे योगदान होते.

बौद्ध धर्माचे क्रांतिकारक स्वरूप :

बौद्ध धर्माचा ज्याप्रमाणे प्रचार-पसार झाला त्याप्रमाणे त्या तुलनेत जैन धर्माचा प्रचार पसार झाला नाही. बौद्ध धर्माने भारताच्या सीमा ओलांडून बाहेरील देशांत आपली पाळेमुळे रुजवली परंतु जैन धर्माच्या बाबतीत तसे घडले नाही. यामागे जैन धर्माची टोकाची असलेली अहिंसा हे एक कारण होते, असे अनेकांना वाटते परंतु कोसंबींनी मात्र याचे विश्लेषण वेगळ्या पद्धतीने केले आहे. त्यांच्यामते, "जैन धर्माचा ज्या कारणामुळे भारताबाहेर प्रसार होण्यास अडथळा आला, त्याच कारणामुळे तो भारतात आजवर टिकून राहिला. म्हणजे बौद्ध धर्माप्रमाणे जातींचा व धार्मिक आचारांचा त्याग न करता त्याने त्यांच्याशी लवकर तडजोड केली." (२००६, १५७) बौद्ध धर्म हा क्रांतिकारक ठरला कारण त्याने जातींचा आणि धार्मिक आचारांचा निषेध केला, याउलट जैन धर्माने जाती व धार्मिक आचारांचा पूर्णपणे त्याग न करता त्यांच्याशी तडजोड केल्याने तो भारताबाहेर जरी पसरला नाही तरी भारतात मात्र टिकून टिकून राहिला, याउलट बौद्ध धर्म जरी भारताबाहेर पसरला पण कालांतराने त्याचा भारतात लोप झाला, हे कोसंबींना सूचित करायचे आहे. इ. स. पूर्व सहाव्या शतकात भारतात अनेक विचार आणि नव्या धर्माचा उदय झाला. अशा मतांची संख्या ६२ सांगितली जाते, आजीवक, जैन धर्म व बौद्ध धर्म त्यातीलच होते. कोसंबी लिहितात की, "या नव्या श्रद्धा म्हणजे एखाद्या निकडीच्या गरजेचा, अविष्कार होता व ही गरज उत्पादन प्रक्रियेच्या पायात होणाऱ्या बदलाची सूचक होती." (२००६, १५७-१५८) याठिकाणी कोसंबी या धर्मांच्या उदयाची मीमांसा धार्मिक दृष्टीकोन ठेवून करत नाही तर उत्पादन प्रक्रियेच्या बदलाच्या दृष्टीने त्याकडे बघतात.

वर्ण-जातींचा केलेला विरोध :

अजूनही काहीजण बौद्ध धर्माला हिंदू धर्मातील पंथ मानतात परंतु बौद्ध धर्माची रचना ही तत्कालीन ब्राह्मणी वैदिक धर्मापेक्षा पूर्ण

वेगळी होती हे समजून घेणे गरजेचे आहे. ब्राह्मण वानप्रस्थाश्रमात जातांना त्याच्या पत्नी व शिष्यासह जाऊ शकत असे, त्यामुळे त्याला संन्यास घेण्याची गरज नव्हती, जंगलात तो गुरेढोरे चारून किंवा फळे गोळा करून आपली उपजीविका करत असे. परंतु बौद्ध धर्मात तसे नव्हते, बौद्ध धर्मात भिक्खू व्हायचे असेल तर संन्यास क्रमप्राप्त होता. शिवाय भिक्खूला उपजीविकेसाठी भिक्षा मागावी लागत असे. कुठल्याही व्यक्तीकडून मिळालेल्या भिक्षेचा त्याला स्वीकार करावा लागत असे, त्यामुळे जाती-जमातीचा असलेला भेद मोडून निघत असे. कोसंबी लिहितात, "भिक्षूला भिक्षेवरच उपजीविका करावी लागत असल्यामुळे कोणाच्याही हातून मलिन झालेले एकवेळचे जेवण देखील मिळाले तर मिळे, नाहीतर त्यांना उपाशी राहावे लागे. त्याबरोबर हे ही खरे की जाती व जमातीत टिकून राहिलेले विधिनिषेध भिक्षूने मोडून टाकले...भिक्षूला दीक्षा मिळताच, म्हणजे अर्धवट जमातीरुपी संघात प्रवेश मिळताच, कुटुंबाचाच नव्हे तर जातजमातीचाही त्याग करावा लागे." (२००६, १६२) त्या काळात जाती-जमातीचा त्याग करने ही सोपी बाब नव्हती परंतु बुद्ध स्वतः वर्ण व जातीव्यवस्थेचे विरोधक व समतावादी असल्याने त्याने भिक्खू संघात प्रवेशासाठी जाती-जमातीच्या त्यागाचा नियम केलेला होता यामुळे वर्ण व जातीव्यवस्थेला विरोध निर्माण झाला. या पार्श्वभूमीवर कोसंबी लिहितात की, "श्रमणाने स्वतः जातीचा त्याग केला असला तरी या पंथापैकी कोणीही एकूण जातीचे समाजातून उच्चाटन करण्यासाठी लढा दिला नाही. बौद्ध भिक्षुसंघाचे कार्य जमाती सभेच्या धर्तीवर चालत असले, तरी बुद्धाचा उपदेश जमात, जात अथवा पंथ याच्या पलीकडील वर्गीय समाजासाठी होता." (२००६, पृ. १६४) या विधानातून कोसंबी यांचा मार्क्सवादी दृष्टीकोन दिसून येतो. बुद्धाचा काळात जातीव्यवस्थेला सुरुवात झाली होती, त्याच्या धर्मात भेदभावाला कुठलाही थारा नव्हता, शिवाय त्याने समतेची शिकवण दिली, या सर्व बाबी जातीव्यवस्थेच्या विरोधातील होत्या, असे असूनही कुणीही जातीचे समाजातून उच्चाटन करण्यासाठी लढा दिला नाही, असे कोसंबींचे म्हणणे संयुक्तिक वाटत नाही.

महायानमुळे झालेले बदल :

बुद्धाच्या काळात ज्या पद्धतीचा बौद्ध धर्म होता आणि ज्यापद्धतीने संघाचे काम चालत होते, बुद्धाच्या नंतर त्यात विविध बदल घडून आलेत. बौद्ध भिक्खू पूर्वी गावोगाव हिंडून धर्माचा प्रचारप्रसार करत असत, परंतु हळूहळू बौद्ध भिक्खू मठात स्थिरावू लागल्याचे दिसून येते. कोसंबी लिहितात, "यह बौद्धधर्म उस बौद्धधर्म से कोसों दूर था जिसका ईसा पूर्व छटी सदी में इसके संस्थापक ने मगध में प्रतिपादन किया था। ऐसे तपस्वी भिक्षु अब भी थे जो नंगे पैर यात्रा करते, खुले में सोते, बचे-खुचे अन्न की भिक्षा ग्रहण करके उदर-निर्वाह करते और लोकभाषा में ग्रामवासियों या आटविको को उपदेश देते; पर उनकी संख्या व प्रतिष्ठा निरंतर घटती जा रही थी। भिक्षु के लिए निर्धारित चीथड़ों से सिले हुए वस्त्रों के स्थान पर अब कीमती केसरिया रंग में रँगे बढ़िया सूती कपड़े, उत्तम ऊन अथवा विदेशी रेशम के सुरुचिसंपन्न वस्त्रों का इस्तेमाल होता था।...जिस प्रकार अपरिग्रह व सादगी के भिक्षु-संघ के पूर्वकालीन नियम त्याग दिए थे, उसी प्रकार पद-प्रतिष्ठा के बोलबाले के कारण पुरातन सिद्धांत भी धुँधले पड़ गए थे।" (२०१६, २२१-२२२) कालानुक्रमे बौद्ध धर्मात कश्याप्रकारे बदल झालेत ते कोसंबींनी सांगितले आहेत. अश्याप्रकारचे बदल सर्वच धर्ममतांमध्ये पाहायला मिळतात परंतु बौद्ध धर्म हा परिवर्तनकारी धर्मविचार असल्याने बौद्ध संघात व तत्त्वज्ञानात जे बदल घडून आलेत त्याचा मागोवा कोसंबी घेतांना दिसतात. बौद्ध धर्मात दोन पंथ (हीनयान व महायान) निर्माण झाल्यानंतर बौद्ध धर्म झपाट्याने बदलू लागला. महायान पंथीयांच्या कृतींमुळे बौद्ध धर्माचे स्वरूप आमुलाग्र बदलले. कोसंबी लिहितात, "महायान ने अपने देवकुल में कई सारे नए देवताओं का, जिनमें गणेश, शिव और विष्णु भी हैं, समावेश कर लिया, पर ये तमाम देवता बुद्ध के अधीनस्त थे। इस समूह में कुछ विशिष्ट देवियाँ भी शामिल कर ली गई; उदाहारण के लिए, अनुपम सुंदरी तारा और मातृदेवी हारिति, जो मूलतः शिशुभक्षक राक्षसी थी। धर्मग्रंथों में सर्पों व राक्षसों के भय-निवारण के लिए जपे जानेवाले मंत्र-तंत्र (धारणीयों) का भी समावेश हो गया।" (२०१६, २२३)

महायान पंथाने बौद्ध धर्माच्या लोकप्रियतेसाठी अशाप्रकारच्या अनेक बाबींचा बौद्ध धर्मात समावेश केला परंतु त्यामुळे बौद्ध धर्म त्याच्या मूळ तत्त्वांपासून दूर जाऊ लागल्याने कालांतराने अडचणी निर्माण झाल्यात. बौद्ध धर्म व ब्राह्मणी धर्म यांच्यात अनेक बाबींमध्ये सारखेपणा निर्माण झाल्याने बौद्ध धर्माचे मोठे नुकसान झाले.

बौद्ध आणि ब्राह्मणांमधील संवाद :

बौद्ध संघाची स्थापना झाल्यावर त्यात वर्ण आणि जातीभेद नसल्याने कुणीही भिक्खू होऊ शकत असे. ज्या ब्राह्मणी कर्मकांडांना बुद्धाने नाकारले त्या ब्राह्मणांना सुद्धा संघात प्रवेश होता. बौद्ध तत्त्वज्ञानाचा प्रभाव ब्राह्मणांवर सुद्धा पडल्याचे दिसून येते कोसंबींच्या मते, "आरंभ से ही बौद्ध-संघ में ब्राह्मण रहे है, जिन्होंने जातिभेद को भले ही त्याग दिया हो, पर अपनी बौद्धिक परंपरा को कायम रखा। प्रचलित ब्राह्मण-विचारधारा को (अनुष्ठान अथवा पूजा-विधि को नहीं) प्रायः मानकर चला जाता था, जैसेकि ब्राह्मणों ने भी गोमांस खाना छोड़ दिया था और अहिंसा को अपना प्रमुख आदर्श स्वीकार कर लिया था।" (२०१६, २२३) यावरून प्राचीन भारतात बौद्ध आणि ब्राह्मण परंपरा पूर्णपणे वेगवेगळ्या नव्हत्या, त्यांच्यात केवळ शत्रुभाव नव्हता तर त्यांच्यात संवाद देखील होता. दोन्ही विचारधारांनी परस्परांना प्रभावित केल्याचे दिसून येते. ख्रिश्चन किंवा इस्लाम प्रमाणे बौद्ध धर्म कधीही राजधर्म बनला नसल्याचे कोसंबींचे मत आहे. नुसते एवढेच नाही तर बौद्ध धर्माने कधीही आपल्या प्रतिस्पर्ध्यांच्या दमनासाठी शासन व्यवस्थेचा वापर केला नसल्याचे ते नमूद करतात. (२०१६, २२३) इतिहासात डोकावून पाहिले तर आपल्या लक्षात येते की, खरोखरच बौद्ध धर्माने कधीही आपल्या प्रतिस्पर्ध्यांना संपवण्यासाठी राजसत्तेचा वापर केला नाही कारण बौद्ध धर्माचा भर तात्त्विक विजयावर होता. बौद्ध धर्माचे हे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य होते.

बौद्ध धर्माचा ऱ्हास :

प्राचीन भारतात महत्त्वपूर्ण दखल देणारा, नवे तत्त्वज्ञान निर्माण करणारा, वर्ण- जातीला विरोध करून समता सांगणारा, अशोक, कनिष्क आणि हर्षवर्धन या महान राजांचा आश्रय मिळवणारा बौद्ध धर्म भारतातून लोप कसा पावला हा महत्त्वाचा प्रश्न आहे. याचे विश्लेषण अनेकांनी आपपल्या परीने केले आहे. याठिकाणी आपण कोसंबींच्या लेखनाची चिकित्सा करत असल्याने त्यांचा दृष्टीकोन लक्षात घेतला आहे. कोसंबींनी त्यांच्या लेखनात बौद्ध धर्माचा 'ऱ्हास' असा शब्दप्रयोग केला आहे, परंतु ऱ्हास या शब्दाशी पूर्णपणे सहमत होता येत नाही, कारण की, बौद्ध धर्म भारतातून पूर्णपणे कधीही संपला नाही, कुठल्या ना कुठल्या स्वरुपात त्याचे अस्तित्त्व टिकून होते, त्यामुळे त्याचा ऱ्हास झाला असे म्हणणे संयुक्तिक वाटत नाही व ज्यावेळी त्याला योग्य वातावरण मिळाले तो पुन्हा अंकुरला. बौद्ध धर्माचा भारतातून ऱ्हास का झाला याची कारणमीमांसा कोसंबींनी पुढीलप्रमाणे केलेली आहे. ह्यूएनत्संगच्या प्रवासवर्णनाच्या हवाल्याने त्यांनी बदलेल्या बौद्ध धर्माचे वर्णन केले आहे. भिक्खूचे मूळ काम सतत भटकंती करणे, सदाचरणाचा मार्ग सर्वांना समजावून सांगणे होते. परंतु बौद्ध धर्म मठांमध्ये स्थिरावल्यावर त्याचे स्वरूप बदलले, श्रीमंत मठांमधील वादविवाद करणारा निवासींचा समूह गावकऱ्यांची काहीही फिकीर करत नव्हता, हा समूह गावकऱ्यांच्या वरकड उत्पादनातूनच चंगळ करत असे, हे बदलेलेले स्वरूप बौद्ध धर्मासाठी नुकसानकारक ठरल्याचा निष्कर्ष कोसंबींनी काढला आहे. (२०२१, ८६) बौद्ध धर्मात झालेले बदल नोंदवितांना कोसंबींनी अशोक आणि हर्षवर्धन यांचे उदाहरण देऊन ते स्पष्ट केले आहे, त्यांच्या मते, "जुन्या बौद्ध धर्मानं अशोकाला युद्धापासून दूर नेऊन शांततेच्या मार्गावर आणलं. आता सैन्याचा वापर आता केवळ जाहीर देखाव्यांसाठी आणि कवायतींसाठीच केला जाईल, असं अशोकाच्या राजाज्ञेत म्हटलेलं होतं. या उलट, धर्मनिष्ठ सम्राट हर्षवर्धन यानं युद्धाची आणि बौद्ध धर्माची सांगड घातली, तसंच त्यांन स्वतःच्या पूजाअर्चेमध्ये सूर्यदेव व महेश्वर यांनाही एकत्र आणलं होतं...तीस वर्ष सतत चाललेल्या आक्रमक युद्धावस्थेदरम्यान हर्षवर्धनच्या सैन्यात साठ हजार हत्ती, एक लाख घोडदळ, आणि त्याहून कितीतरी अधिक संख्येनं

पायी सैनिकांची भर पडली होती. (२०२१, ८७) हर्षवर्धनाने युद्ध आणि बौद्ध धर्माची सांगळ घातल्याने बौद्ध धर्माची हानी झाल्याचे कोसंबींना वाटते.

इ. स. पूर्व सहाव्या शतकात वैदिक यज्ञात दिला जाणारा पशुबळी ही मोठी समस्या होती, तसेच समाजाला सभ्यतेकडे नेणाऱ्या तत्त्वज्ञानाची गरज होती, हे कार्य बौद्ध धर्माने पार पाडले तद्वतच गौतम बुद्धाने वर्ण-जातीविरोधी भूमिका घेतल्याने बौद्ध धर्म जनमानसात लोकप्रिय ठरला. परंतु नंतरच्या काळात झालेल्या बदलांनी बौद्ध धर्माची भूमिका मर्यादित झाली असे कोसंबींचे आकलन आहे. त्यांच्या मते, "महत्त्वाच्या सामाजिक गरजेच्या पुर्तीमुळं बौद्ध धर्माला आरंभीच्या काळात यश मिळालं...जमातीच्या गटापासून ते वैश्विक समाजापर्यंतचा हा मार्ग चोखाळताना नवीन सामाजिक तत्त्वज्ञानाचीही गरज होती... इसवी सन सातव्या शतकाच्या दरम्यान बौद्ध धर्माचं सभ्यताकरणाचं मुख्य कार्य संपून गेलं होतं. अहिंसा तत्त्वाचं सार्वत्रिक उपयोजन झालं नसलं, तरी स्वीकार झाला होता. काही मोजके राजे सोडले तर इतरत्र वैदिक बळीयज्ञाची प्रथा सोडून देण्यात आली होती. गावांमधील वर्गरचना जात म्हणून दृश्यमान झाली. बौद्धांनी जातीचा कायमच अव्हेर केला. आदिम जमातींच्या सदस्यांना नवीन जाती म्हणून यात भरती करून घेतलं जात असे. जमातींचे सदस्य आणि शेतकरी दोघेही रूढींवर मोठ्या प्रमाणात विसंबून होते. या रुढींचं पालन करण्यापासून बौद्ध साधूंना प्रतिबंध करण्यात आला होता. रुढींचा व्यवहार ही ब्राह्मणांची मक्तेदारी राहिली." (२०२१, ८८-८९) एकूणच काय तर बदलत्या परिस्थतीनुसार बौद्ध धर्माचे काम संपले होते असे कोसंबी यांना वाटते. सोबतच रूढी परंपरांवर ब्राह्मणी मक्तेदारी असल्याने जमाती व शेतकरी वर्गावर त्यांचा प्रभाव निर्माण झाला. जसाजसा बौद्ध धर्माचा प्रचार-प्रसार होत गेला तसतसा ब्राह्मणी धर्माने त्याला आपल्या कवेत घेण्याचा प्रयत्न केला, त्यासाठी विविध युक्त्या त्यांनी केल्या. कोसंबी यांनी बौद्ध मठांना अनुत्पादक म्हटले आहे तर ब्राह्मणाला उत्पादनाला उत्तेजन देणारा म्हटले आहे, ते लिहितात, "त्या काळी ब्राह्मण हा उत्पादनाला उत्तेजना देणारा उद्गाता होता. कारण नांगरणी, पेरणी, कापणी यांसाठीच्या वेळेचा पूर्वअंदाज वर्तवणारी चांगली दिनदर्शिका (पंचांग) ब्राह्मणांकडं होती, नवीन पिकं आणि व्यापारी शक्यतांविषयी त्याला काही ना काही माहिती होती. त्याचे यज्ञकर्ते पूर्वज किंवा बड्या बौद्ध मठांसारखा तो उत्पादनाचा अपव्यय करणारा घटक नव्हता. बुद्धाला विष्णूचा अवतार मानून याबाबतीत तडजोड करण्याचीही शक्यता निर्माण झाली. त्यामुळे औपचारिक बौद्ध धर्म विरून गेला." (२०२१, ८९) यावरून ब्राह्मणी मतांची उत्पादकता आणि बौद्ध मठांची अनुत्पादकता सिद्ध करण्याचा प्रयत्न कोसंबी यांनी केला असून त्याला बौद्ध धर्माच्या ऱ्हासाशी जोडले आहे. एकूणच काय तर कोसंबी यांनी बौद्ध धर्माच्या ऱ्हासासाठी बौद्ध धर्मालाच जबाबदार ठरवले आहे. सातव्या शतकाच्या प्रारंभी बंगालचा राजा शशांक याने अनेक बौद्ध मूर्तींना नष्ट करून गया येथील बोधीवृक्षाला सुद्धा उपटून टाकले होते, हे सर्वविदित आहे. परंतु हर्षवर्धनाच्या काळात सर्व काही सुरळीत झाले. बौद्ध धर्माचे शेवटचे संरक्षक पाल राजे होते, त्यांच्याच काळात बख्तियार खिलजीने आक्रमण केले आणि बौद्ध धर्माचे उरलेसुरले अस्तित्त्व संपवून टाकले. कोसंबी लिहितात, "१२०० ई. के. आसपास मुट्ठी-भर सिपाहियों को लेकर जब मुहम्मद बिन-बख्तियार खिलजी ने मगध व् पश्चिमी बंगाल पर चढ़ाई की तो इन विहारों को लूटकर पूरी तरह नष्ट कर दिया गया।" (२०१६, २२५)

निष्कर्ष :

दामोदर कोसंबींच्या बौद्ध धर्मावरील लेखनाचा चिकित्सक अभ्यास करताना काही बाबी प्रकर्षाने जाणवतात. कोसंबींनी बौद्ध धर्माच्या अनुषंगाने जे लिखाण केले आहे त्यात त्यांचा मार्क्सवादी दृष्टीकोन दिसून येतो. उत्पादन संबंध, उत्पादनाची साधने आणि व्यापारातील चढउतार यांचा संबंध त्यांनी बौद्ध धर्माशी जोडून दाखवला आहे व या बाबींचा बौद्ध धर्मावर कसा प्रभाव पडला त्याचेही विश्लेषण त्यांनी केलेले आहे. बौद्ध धर्म विकासच्या अवस्थेत ज्या टप्प्यांमधून पुढे गेला, त्यातील महत्त्वपूर्ण बारकावे कोसंबींनी उलगडून सांगितले आहेत.

विशेषतः महायान पंथामुळे जे बदल बौद्ध धर्मात झालेत त्याचे सखोल विश्लेषण त्यांनी केले असून महायान पंथामुळे बौद्ध धर्मात झालेला देवी-देवतांचा शिरकाव, सैद्धांतिक परिवर्तन याचा उत्तम उहापोह त्यांनी केला आहे. बौद्ध धर्म जेव्हा मठांमध्ये स्थिरावला तेव्हा त्यात झालेल्या बदलांनी बौद्ध धर्माचे कसे नुकसान झाले याचीही मांडणी त्यांनी केली आहे. बौद्ध धर्मात जे अंतर्गत दोष उत्पन्न झाले होते त्यामुळे बौद्ध धर्म ऱ्हासाकडे गेल्याचे कोसंबींचे मत आहे, त्यामुळे त्यांनी बौद्ध धर्मातील अंतर्गत दोषांची व्यापक चर्चा केली आहे. याबरोबरच त्यांनी ब्राह्मणी धर्माने कसे बुद्धाला अवतार म्हणून घोषित करून बौद्ध धर्माला आपल्या कवेत घेण्याचा प्रयत्न केला त्याचेही विश्लेषण केले आहे. तत्कालीन समाजात रूढी परंपरा प्रचलित होत्या या रूढी परंपरांकडे बौद्ध धर्माने पाठ फिरवली होती परंतु त्यावर ब्राह्मणाचे नियंत्रण असल्याने त्यांचे सामान्य लोकांवर प्रभाव कायम राहिल्याचे महत्त्वपूर्ण निरीक्षण कोसंबींनी नोंदवले आहे. त्यांनी बौद्ध धर्माच्या अनुषंगाने काही विधाने केली आहेत जी पटण्यासारखी नाहीत. उदा. इसवी सन सातव्या शतकाच्या दरम्यान बौद्ध धर्माचं सभ्यताकरणाचं मुख्य कार्य संपून गेले होते कारण अहिंसा तत्त्वाचं सार्वत्रिक स्वीकार झाला होता. काही मोजके राजे सोडले तर इतरत्र वैदिक बळीयज्ञाची प्रथा सोडून देण्यात आली होती. हे जरी सत्य मानले तरी यामुळे बौद्ध धर्माचं सभ्यताकरणाचं मुख्य कार्य संपून गेले होते आणि त्यामुळे बौद्ध धर्माची गरज उरली नव्हती असा जो निष्कर्ष कोसंबी काढतात ते संयुक्तिक वाटत नाही, कारण सभ्यताकरणाचे काम कधीही संपत नाही ते सतत सुरु असते, दुसरी बाब जातिव्यवस्थेच्या निर्मूलनाचे तत्त्वज्ञान बौद्ध धर्माकडे असल्याने त्याची गरज होतीच. असे असले तरी दामोदर कोसंबी यांनी बौद्ध धर्माच्या अनुषंगाने जे लिखाण केले आहे त्याचे महत्त्व कमी होत नाही, उलट बौद्ध धर्माला समजून घेण्यात ते मदतीचे ठरते.

संदर्भ :

कोसंबी, दामोदर धर्मानंद. २००६. *भारतीय इतिहासाचा अभ्यास*. भाषांतरकार दि. का. गर्दे. पुणे : डायमंड प्रकाशन.

कोसंबी, दामोदर धर्मानंद. २०१६. प्राचीन भारत की संस्कृति और सभ्यता. अनुवाद गुणाकर मुळे. नई दिल्ली : राजकमल प्रकाशन

कोसंबी, दामोदर धर्मानंद. २०२१. *संतापजनक निबंध*. भाषांतरकार अवधूत डोंगरे. मुंबई : लोकवाङ्मय गृह.